डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेकरिता निधी वितरीत व आहरित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक: तंनिवि-१५१९/(प्र.क्र.५९/१९)/तांशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक: १६ जुलै, २०१९.

वाचा: -

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टोबर, २०१६
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४०७/तांशि-४, दि.२२ फेब्रुवारी, २०१८
४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८५/तांशि-४, दि.१८ जून, २०१८
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१ एप्रिल, २०१९.
६) संचालक, तंत्रशिक्षण यांचे क्र.१८/अर्थसं/डॉ.पंदेवनिभ/खप्रमा/२०१८-१९/२०६, दि.२० एप्रिल, २०१९.
७) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन ज्ञापन क्रमांक: तंनिवि-१५१९/(प्र.क्र.५९/१९)/तांशि-३, दि.१३ मे, २०१९.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

संदर्भ क्र.२ येथील दि.१३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानित व विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी राज्यातील महानगरांतील (मुंबई, पुणे प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी प्रतीमाह रु.३०००/- व अन्य ठिकाणी असलेल्या वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी प्रतीमाह रु.२०००/- या प्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेंतर्गत वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

तसेच संदर्भ क्र.४ येथील दि.१८ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकाचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष पर्यंत आहे, अशा विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत महानगरासाठी (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक

विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद/नागपूर इ.) व इतर शहरे/ग्रामीण भागासाठी प्रति वर्षी अनुक्रमे रु.१०,०००/- व रु.८,०००/- इतका निर्वाह भत्ता अनुज्ञेय आहे.

"डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेसाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये मूळ अर्थसंकल्पात रु.७०.०० कोटी तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. सदर मंजूर तरतूदीपैकी सन २०१८-१९ च्या प्रलंबित निर्वाह भत्त्याकरीता रु.७०.०० कोटी इतकी तरतूद चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीमधून खर्च करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास सादर केला होता. वित्त विभागाच्या सूचनेनुसार या योजनेखालील वार्षिक कार्यक्रम २०१९-२०२० करीता मंजूर तरतूदीतून रु.२३.२० कोटी इतकी तरतूद संदर्भाधीन दि.१३ मे, २०१९ च्या शासन ज्ञापन अन्वये वितरीत करण्यात आली आहे. आता वित्त विभागाने संदर्भाधीन दि.८ जुलै, २०१९ च्या परीपत्रकान्वये अनिवार्य व कार्यक्रम खर्चाची मर्यादा ६० टक्के केली आहे. त्यास अनुसरुन या योजनेर्गत उर्वरित रु.१८.८० कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन ज्ञापन :

"डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेखाली सन २०१८-१९ मधील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याची रक्कम अदा करण्याकरीता खाली नमूद केल्याप्रमाणे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीपैकी, रु.१८.८० कोटी (अक्षरी रुपये अठरा कोटी ऐंशी लक्ष फक्त) इतकी रक्कम संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांना "खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून" आंहरित व वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत असुन, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

योजनेचे नांव	२०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित निधी	वितरणासाठी ६० टक्के प्रमाणे उपलब्ध निधी	चालू वर्षी वितरीत केलेला निधी	शिल्लक निधी	वितरीत करावयाचा निधी
डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना	७०.००	४२.००	२३.२०	४६.८०	१८.८०

अटी :-

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टोबर, २०१६ व या योजनेसंदर्भातील त्यानंतरच्या दि.७ ऑक्टोबर, २०१७, दि.२२ फेब्रुवारी, २०१८, दि.१८ जून, २०१८ व इतर आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२) उपलब्ध तरतूद महाडिबीटी पोर्टलवरुन पात्र विद्यार्थ्यांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन वितरीत करण्यात यावी.

३) संचालक, तंत्रशिक्षण व सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नमुन्यादाखल काही संस्थाना भेट देऊन या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितरीत्या होत असल्याची वेळोवेळी तपासणी करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४) यापूर्वीच्या तपासणी अहवालात काही त्रुटी/अनियमितता आढळून आली असल्यास ती तात्काळ दूर करण्यासाठी आवश्यक ती उपयायोजना संचालक, तंत्रशिक्षण यांनी करावी.

५) चूकीची अथवा खोटी माहिती भरुन शासनाकडून निर्वाह भत्ता प्राप्त करुन घेंतले असल्याचे निदर्शनास आले असल्यास अशी रक्कम वसूल करुन ती शासन जमा करण्यात यावी.

६) या शासन ज्ञापनाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत निधीचे तात्काळ वाटप करावे व उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे. निधीचे वाटप करण्यास विलंब करु नये. याबाबतची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण व सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांची राहील.

३. उपरोक्त योजनेखाली करण्यात येणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२२०३-तंत्रशिक्षण, मागणी क्र.डब्ल्यू-३, तंत्रशिक्षण १०७, शिष्यवृत्ती (००) (००)(०९) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, (कार्यक्रम) (२२०३ ३५४२) ३४, शिष्यवृत्ती/विद्यावेतने" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व चालू आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हे शासन ज्ञापन वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये व संदर्भाधिन परिपत्रक दि.८ जुलै, २०१९ मधील परिच्छेद २, ४ व ११ मधील तरतूदीनुसार निधी वितरीत करण्याबाबत दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे .

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्याचा सांकेतांक २०१९०७१६१५५३०६०९०८ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANALI MILIND SAMANT

Digitally signed by MANALI MILIND SAMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a393e9553ec410a2133a89ca969ca76abd4ca892102ef711a7fff2d0c54599c7, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c63b0a0419f0eb37099daca08e4cccce3bf49154bf43e8881e68ac2ca3a46392, ou=HIGHER AND TECH, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANALI MILIND SAMANT
Date: 2019.07.16 17:11:49 +05'30'

(मनाली सामंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय तंत्रशिक्षण सह संचालक. (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, बृहन्मुंबई.
७) नियोजन विभाग/वित्त विभाग, व्यय-५/अर्थसंकल्प-८, मंत्रालय, मुंबई.
८) अवर सचिव/तांशि-४, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी/साशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती/तांशि-३.